

यशवार्ता

ज्ञानगंगा घरोघरी

वर्ष १ | अंक 3 | डिसेंबर २०२४ | पाने १० | खाजगी वितरणासाठी



Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



◆ **मार्गदर्शक**
मा. कुलगुरू प्रा. श्री. संजीव सोनवणे
मा. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन

◆ **प्रकाशक**
श्री. दिलीप भरड (कुलसचिव)

◆ **संपादक मंडळ**
प्रा. डॉ. संजीवनी महाले
डॉ. गोविंद कतलाकुटे
डॉ. जयदीप निकम
प्रा. राम ठाकर
प्रा. प्रकाश देशमुख
प्रा. सज्जन थूल
प्रा. डॉ. माधुरी सोनवणे
प्रा. नागार्जुन वाडेकर
प्रा. डॉ. नितीन ठोके
डॉ. बाळासाहेब दिघे
डॉ. राजेंद्र बगाटे

◆ **संपादक**
प्रा. विजयकुमार पाईकराव

◆ **कार्यकारी संपादक**
श्री. महेंद्र बनसोडे

◆ **उपसंपादक**
श्री. सचिन तरवटे

◆ **निर्मिती**
श्री. विलास बधान

◆ **मुद्रितशोधक**
श्री. योगेश जाधव

◆ **प्रकाशचित्रे**
श्री. राजेश बर्वे

◆ **तांत्रिक सहकार्य**
श्रीमती भावना भऊरकर

◆ **सहाय्य**
श्रीमती प्रतिभा काशीद, श्री. नितीन जोंधळे

गृहपत्रिका

संपादकीय

संमंत्रक

सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी हा केंद्रस्थानी असून शिक्षक हा फक्त अध्यापन करणारा राहिलेला नसून तो एक मार्गदर्शक, सल्लागार, समुपदेशक, संमंत्रक अशा वेगवेगळ्या भूमिकांमधून कार्य करीत आहे. पारंपरिक शिक्षण व्यवस्थेत शिक्षकाला 'अध्यापनाचे' कार्य तर मुक्त आणि दूरशिक्षणामध्ये संमंत्रकाला 'संमंत्रणाचे' महत्त्वाचे कार्य करावे लागते. संमंत्रण या शब्दास इंग्रजी भाषेत 'Counselling' असे जरी संबोधले जात असले तरी दूरशिक्षणातील Counselling' हा शब्द अध्ययन-अध्यापन पद्धती, शैक्षणिक मार्गदर्शन, शैक्षणिक समुपदेशन या संकल्पनांशी संबंधित आहे. मुक्त आणि दूरशिक्षण पद्धतीमध्ये मुद्रित व दृकश्राव्य माध्यमांचा वापर अधिक प्रमाणात केला जातो, तसेच या पद्धतीमध्ये स्वयं-अध्ययनाला चालना मिळविण्याच्या हेतूने संमंत्रणाची व्यवस्था केलेली आहे. संमंत्रण म्हणजे शैक्षणिक व्यवस्थेत समाधानकारक प्रगती करण्यासाठी विद्यार्थ्याला दिला जाणारा सल्ला, मदत व आधार होय. सल्ला, मदत व आधार या बाबींमध्ये योग्य समन्वय साधणे अतिशय महत्त्वाचे आहे. म्हणूनच संमंत्रणाचे कार्य करणाऱ्या संमंत्रकाने आवश्यक ती कौशल्ये जोपासणे महत्त्वाचे आहे.

मुक्त आणि दूरशिक्षण पद्धतीमध्ये संमंत्रण प्रक्रियेमध्ये प्रामुख्याने तीन कृती महत्त्वाच्या असतात- (१) माहिती देणे, (२) सल्ला देणे किंवा मार्गदर्शन करणे, (३) समुपदेशन करणे ह्या तीन कृतींमुळे संमंत्रण प्रक्रिया ही अध्यापन प्रक्रियेपेक्षा वेगळी ठरते. परंपरागत पद्धतीत शिक्षकांना साधारणपणे कशाचे अध्यापन करायचे?', कसे करायचे?', शिकवण्याची पद्धती कोणती वापरायची?' अशा सर्व गोष्टींचे पूर्वनियोजन करावे लागते. परंतु संमंत्रणामध्ये विद्यार्थ्यांचे प्रश्न व त्यांची शैक्षणिक गरज ही केंद्रस्थानी ठेवून इतर बाबींचे महत्त्व कमी केलेले आपल्याला अढळते. त्यामुळेच मुक्त आणि दूरशिक्षणामध्ये संमंत्रण करणाऱ्या संमंत्रकाची अभियोग्यता तपासणे महत्त्वाचे आहे. प्रामुख्याने या शिक्षणपद्धतीमध्ये काम करणारा संमंत्रक हा पारंपरिक महाविद्यालयामध्ये अध्यापनाचे काम करणारा एक शिक्षकच असतो, परंतु पारंपरिक पद्धतीने अध्यापन करणे व मुक्त आणि दूरशिक्षणातील संमंत्रण करणे या दोन प्रकारामध्ये फरक आहे. पारंपरिक महाविद्यालयातील विद्यार्थी हा नियमित असतो, तर मुक्त व दूरशिक्षण पद्धतीमधील विद्यार्थी हा स्वयंप्रेरित, प्रौढ व फक्त संपर्कसत्रामध्ये येणारा असतो. त्यामुळे या ठिकाणी शिक्षकाची भूमिका ही बदलेली आहे. हा बदल सहजपणे सर्वच शिक्षकांना आत्मसात करता येईलच असे नाही. मुक्त आणि दूरशिक्षणामध्ये संमंत्रकाची भूमिका ही केवळ एक अध्यापकाची नसून ती समुपदेशकाची असते. म्हणून या शिक्षणपद्धतीत संमंत्रक होऊ इच्छिणारे शिक्षक हे ज्ञानी असावेत. त्यांना मुक्त आणि दूरशिक्षण पद्धतीची माहिती असावी. संमंत्रकाला तत्त्वे, कार्य, जबाबदाऱ्या, भूमिकांची जाणीव असणे महत्त्वाचे आहे. संमंत्रणाच्या क्षेत्राबद्दल सर्व मूलभूत माहिती असावी. संमंत्रकाचे संमंत्रण कार्य हे केवळ एक व्यवसाय म्हणून न समजता एक सेवा म्हणून या क्षेत्राकडे पाहण्याची दृष्टी असावी लागते.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्देशानुसार

सायबर सुरक्षा अभ्यासक्रम

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युनिवर्सिटी ग्रांट कमिशन - यूजीसी) निर्देशानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे 'सायबर सुरक्षा' (सायबर सेक्युरिटी – Cyber Security) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षतेबद्दल जागरूकता वाढणे, त्यांनी तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर करण्यास शिकणे आणि भारतासह जगभरात वाढत चाललेल्या सायबर गुन्ह्यांपासून त्यांचा बचाव होणे हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.



विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सायबर जागरूकता दिवस (दिनांक ६ ऑक्टोबर) च्या पार्श्वभूमीवर ऑक्टोबर २०२२ मध्ये देशभरातील सर्व विद्यापीठांना 'सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाची' अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे सर्व पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणक्रमास प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना 'सायबर सुरक्षा' हा अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला आहे. बी.सी.ए.सारख्या शिक्षणक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील या अभ्यासक्रमास प्रवेश घेता येईल. हा अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्देशानुसार सुरू करण्यात आलेला आहे. विशेष म्हणजे त्यासाठीचे अभ्यासक्रम - अध्ययन साहित्य हे विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वतः विकसित करून उपलब्ध करून दिलेले आहे. यासाठी गेल्या सप्टेंबर महिन्यात विद्यापीठाच्या विद्वत परिषदेची (अॅकॅडेमिक कौन्सिल) विशेष बैठक होऊन त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यापीठाच्या विद्वत परिषदेने निश्चित केल्यानुसार सदर 'सायबर सुरक्षा' अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ पासून विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल. तो मराठी व इंग्रजी अशा दोन भाषांमध्ये ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाच्या वायसीएमओयू स्टुडंट अॅपद्वारे (YCMOU Student App) देखील प्रवेश घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा कालावधी हा पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन वर्षे तर पदव्युत्तरसाठी दोन वर्षे इतका आहे. याची परीक्षादेखील ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. सदर अभ्यासक्रमासाठी एकदाच पाचशे रुपये एवढे शुल्क भरायचे आहे. त्यानंतर या अभ्यासक्रमाच्या परीक्षेत विद्यार्थी प्रथम प्रयत्नात यशस्वी झाला नाही तरी त्यासाठी त्याचा प्रवेश ग्राह्य राहील व तो विद्यार्थी ती परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत त्याच्याकडून नंतर याबाबत इतर कुठलेही शुल्क घेतले जाणार नाही.

'सायबर सुरक्षा' अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यास त्याचे उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. मात्र सदरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यास त्याच्या मूळ शिक्षणक्रम पदवी उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी आपली पदवी / पदव्युत्तर पदवी प्राप्त करण्यासाठी हा 'सायबर सुरक्षा' अभ्यासक्रम विहित वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. सदर अभ्यासक्रम प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना मोबाईल अॅपद्वारे नावनोंदणी करावी लागेल. त्यासाठीची अँड्रॉइड लिंक (Android - https://play.google.com/store/apps/details?id=org.mkcl.ycmoudu व आयओएस लिंक (IOS - https://apps.apple.com/in/app/ycmou-student/id6475083272 देखील उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विद्याशाखेचे संचालक प्रा. माधव पळशीकर यांनी केले आहे.



शिक्षणशास्त्र पदव्युत्तर संशोधक मार्गदर्शक कार्यशाळा संपन्न

संशोधनास सुरुवात करण्याआधी आपल्या भोवतालचे जग, त्या जगातील समस्या, त्या समस्यांवर किती जणांनी काय काय काम केले हे समजून घेतले पाहिजे. त्यानंतर त्यात असलेली ज्ञानाची पोकळी (नॉलेज गॅप) ओळखून मग आपले संशोधन व त्याची पुढची दिशा ठरवली पाहिजे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी येथे व्यक्त केले. विद्यापीठाच्या यश इन सभागृहात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठाच्या एम.ए. शिक्षणशास्त्र विषयाचे केंद्रप्रमुख व संमंत्रक यांच्यासाठी आयोजित दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा विद्यापीठ शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका प्रा. डॉ. संजीवनी महाले यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी 'एकविसाव्या शतकातील संशोधनाची क्षेत्रे' या विषयावर आपल्या भाषणात पुढे बोलताना मा. कुलगुरू सोनवणे म्हणाले की, सध्या जगभरात कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन, लिंग समानता, जल – माती – वायू याविषयीचे संशोधन वेगवेगळ्या पातळींवर सुरू आहे. त्यातही मिश्र संशोधन पद्धतीचा वापर करण्यावर अधिक भर दिला जात आहे. त्याची आपण माहिती ठेवली पाहिजे. ज्ञाननिर्मिती ही उच्च शैक्षणिक संस्थांचे उद्दिष्ट असते आणि ज्ञाननिर्मितीसाठी संशोधन हे अत्यावश्यक आहे. संशोधनासाठी संशोधकाच्या मनात प्रश्न निर्माण होणे आवश्यक आहे. समाजातील, परिसरातील आपल्याला भेडसावणाऱ्या, खटकणाऱ्या गोष्टी - समस्या यातूनदेखील संशोधन विषय प्राप्त होऊ शकतो. आपण करत असलेले संशोधन त्या समस्या निवारणासाठी, समाजहितासाठी किती योगदान देऊ शकते याचा विचार संशोधकाने करायला हवा. झेरॉक्स कागदाचा सहा वेळा वापर करता येईल असे यंत्र, मनुष्य निसर्गाचा किती वापर करून घेतो अशी 'इकॉलोजीकाल फुटप्रिंट संकल्पना' अशा एक ना अनेक गोष्टी विविध संशोधनातून समोर येत आहेत. भारतातील शैक्षणिक संशोधनाच्या बाबतीत इच्छुक संशोधकांनी विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) व राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) यांचे गेल्या दोन वर्षातील निर्णय यांचा अभ्यास करावा, असे आवाहन मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी केले. शिक्षक हा समाजव्यवस्थेचा आत्मा आणि या शिक्षकांचा शिक्षक हा संमंत्रक असतो. आपला व्यापक समाजरथ कुठे घेऊन जायचा ही शिक्षणव्यवस्थेतील या घटकांची जबाबदारी असते व त्यांचा प्रत्यक्ष – अप्रत्यक्षरित्या थेट देशाच्या उन्नतीशी संबंध असतो, पुरातन काळापासून भारतीय समाज हा शैक्षणिक दृष्ट्या प्रगत होता. हिंदीतील प्रसिद्ध कवी मैथीलीशरण गुप्त यांचे 'भारतभारती' हे पुस्तक वाचल्यावर आपल्याला हे लक्षात येते. त्यामुळे भारतीय शिक्षणव्यवस्था ही मागासलेली होती हा गैरसमज जाणीवपूर्वक पसरविण्यात आला. शिक्षकांनी अशा माहितीची सत्यता पडताळणी करून ज्ञानदानाचे कार्य करावे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी समारोपप्रसंगी केले. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा विद्यापीठ शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका प्रा. डॉ. संजीवनी महाले, विद्यार्थी सेवा सुविधा विभागाचे संचालक प्रा. प्रकाश देशमुख यांची विशेष उपस्थिती होती.

त्यानंतर या कार्यशाळेत एम.ए. शिक्षणशास्त्र संरचना आणि मूल्यमापन (प्रा. स्नेहल मांजरेकर), संपर्कसत्र कार्यवाही (प्रा. विजयकुमार पाईकराव), विद्यापीठ परिचय (प्रा. डॉ. संजीवनी महाले), ऑनलाईन पद्धतीने कृती सादरीकरण (परीक्षा विभागाचे श्री. प्रदीप पवार व श्री. चंद्रकांत पवार), संशोधन कार्य (प्रा. डॉ. संजीवनी महाले), शोधनिबंध विकसन (डॉ. राजकुमार ननवरे), अध्यपनविषयक क्षेत्रीय कार्य आणि आंतरवासियता कार्यवाही (डॉ. सुभाष सोनुने), संमंत्रण संकल्पना व संमंत्रण प्रतिमाने परिचय (डॉ. दयाराम पवार), संशोधनात शोधगंगासह माहिती तंत्रज्ञानाचा वापर (डॉ. प्रकाश बर्वे), प्राशिनक परीक्षक समीक्षक कार्ये (प्रा. सज्जन थूल) आदी विषयांवर संबंधित तज्ज्ञ व्यक्तींद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्या प्रा. स्नेहल मांजरेकर यांनी केले.



संशोधन निबंध लेखन कार्यशाळा संपन्न

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली दोनदिवसीय राष्ट्रीय स्तरावरील संशोधन निबंध लेखन कार्यशाळा (Research Paper Writing - रिसर्च पेपर रायटिंग) संपन्न झाली. सदर कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले, तर समारोप विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका तथा व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र तसेच स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग यांच्यामार्फत 'यश इन' सभागृहात दिनांक २६ व २७ नोव्हेंबर रोजी ही कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचा १३० हून अधिक संशोधक विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य यांनी लाभ घेतला. विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड यांच्या नियोजनाखाली ही कार्यशाळा झाली.

आपल्या उद्घाटनपर अध्यक्षीय भाषणात विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन म्हणाले की, संशोधन करताना त्याचा दर्जा मात्र राखला गेला पाहिजे. त्यात वाङ्मय चौर्य किंवा इतर दुष्प्रवृत्तींना अजिबात थारा देता कामा नये. नवोदित संशोधक विद्यार्थ्यांनी आपली आर्थिक व बौद्धिक फसवणूक टाळण्यासाठी केवळ विद्यापीठ अनुदान आयोग (यू. जी. सी.) मान्यताप्राप्त मासिकांमध्येच आपले संशोधन लेख प्रकाशित करण्यासाठी पाठवावेत, असे आवाहन केले. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका तथा व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले यांनी नवोदित संशोधक विद्यार्थी आणि त्याचबरोबर शिक्षक – प्राध्यापक यांच्यासाठीदेखील अशा प्रकारच्या कार्यशाळा या उपयुक्त ठरत असल्याचे सांगितले.

सदर कार्यशाळेचे उद्घाटन झाल्यानंतर प्रथम सत्रात सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठाचे सेवानिवृत्त ग्रंथपाल प्रा. राजेंद्र कुंभार यांनी 'संदर्भ शैली आणि साहित्यचौर्य' (Referencing Styles & Plagiarism) या विषयावर मार्गदर्शन केले. सोलापूर येथील डी. बी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी ग्रंथसूची व संकेतस्थळ सूची (बिब्लिओग्राफी व वेब्लीओग्राफी) याविषयी उपयुक्त माहिती दिली.

प्रथम दिवसाच्या अंतिम सत्रात विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्राचे संचालक प्रा. व्ही. बी. गायकवाड यांनी 'उद्धरण (एच इंडेक्स, 110 इंडेक्स), प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय मासिके / जर्नल (स्कोपस/डब्ल्यूओएस) मधील प्रकाशन आणि त्या प्रकाशकांसोबतचा संवाद' (Citations (H Index, 110 Index), Publications in Reputed International Journal (Scopus/WoS) & Communication with the Publisher याविषयी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक विद्यापीठाच्या प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र तसेच स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंगच्या संचालिका इमरटस प्रा. डॉ. कविता साळुंके यांनी केले. त्यात त्यांनी संशोधन निबंध लेखन कार्यशाळा (रीसर्च पेपर रायटिंग वर्कशॉप) ची गरज, महत्त्व, संशोधन निबंध लिहिताना घ्यावयाची काळजी, होणाऱ्या चुका, त्यातील बारकावे या संदर्भात माहिती दिली.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी मुंबई येथील एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या डॉ. सारिका सावंत यांनी 'शोधनिबंध लिहिण्याची सिद्धता व तयारी' (Mechanism of Writing Research Paper) याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. संशोधन कार्य व संशोधन लेखामुळे खरा संशोधक ओळखला जातो अशी पुस्ती त्यांनी जोडली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. वैभव जाधव यांनी संशोधन लेख लिहिताना संशोधकाने पाळावयाची नैतिकता आणि नीतिमूल्ये याबाबत मार्गदर्शन केले. 'चॅट जीपीटी' सारख्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे संशोधक विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक यांच्यापुढे नवीन आव्हाने निर्माण झाल्याचेही त्यांनी नमूद केले. मुंबई येथील एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या डॉ. ज्योती भाबळ यांनी 'शैक्षणिक लेखनात ज्ञानस्त्रोत केंद्रांचा वापर' (Use of Knowledge Resource centers in academic writing) या विषयावर मार्गदर्शन केले. समारोपप्रसंगी श्री. राहुल गायकवाड, श्रीमती अनुराधा पंडित, श्रीमती जागृती चव्हाण, राजकुमार ननावरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी या कार्यशाळेमुळे संशोधन लेख विकसित करताना आवश्यक असणाऱ्या अनेक नवीन बाबींचे ज्ञान प्राप्त झाले असे मत व्यक्त केले. कार्यशाळेच्या सर्व सत्रांचे सूत्रसंचालन डॉ. वसुदेव राऊत आणि डॉ. विद्यादेवी बागुल यांनी केले. डॉ. सचिन पोरे यांनी संयोजन केले.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात शेतकरी हिताची

'यूकेआय संवाद' डिजिटल उपक्रम सहनिर्मिती कार्यशाळा संपन्न

'यूकेआय संवाद' हे शेतकऱ्यांसाठी एक आधुनिक आयुध असून त्यातून शेतीशी निगडित अनेक कामे, प्रश्ने मार्गी लागू शकतील, असा विश्वास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी येथे व्यक्त केला. विद्यापीठाच्या यश इन सभागृहात आयोजित 'यूकेआय संवाद' या डिजिटल उपक्रम सहनिर्मिती कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, फिडे (FIDE - फाउंडेशन फॉर इनोव्हेशन अँड डेव्हलपमेंट ऑफ इकोसिस्टम्स), आयएलएफ (ILF - इंडिग्राम लॅब्स फाऊंडेशन) आणि स्पेक्ट्रम इम्पॅक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने या सहनिर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून फिडेचे केतव मेहता, स्पेक्ट्रम इम्पॅक्टचे श्री. मिरीक गोगरी, आयएलएफचे श्री. सुनील खैरनार, यूकेआयचे (UKI – युनिफाईड कृषी इंटरफेस) श्री. महेश रसाळ, महाएफपीओ फेडरेशनचे श्री. संजय पांढरे, कृषिभूषण श्री. भूषण निकम, कृषिअभ्यासक व विश्लेषक श्री. दीपक चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आपल्या भाषणात मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की, शेतकरी हितासाठी दक्ष असणारे छत्रपती शिवराय आणि शेतकऱ्यांचा आसूड लिहिणारे महात्मा जोतीराव फुले यांचा शेतकरी हिताचा विचारच आपण त्यांचे पाईक म्हणून पुढे नेत आहोत. त्यानुसार तंत्रज्ञान आधारित 'यूकेआय संवाद' हे शेतकऱ्यांसाठी आधुनिक आयुध आहे. प्रायोगिक पातळी पूर्ण झाल्यावर व व्यावहारिक पातळीवर पूर्ण क्षमतेने त्याचा वापर सुरू झाल्यावर सर्वसामान्य शेतकरी वर्गाच्या जीवनातील अंधार दूर होऊन शेतीशी निगडित अनेक कामे, प्रश्ने मार्गी लागू शकतील, असा विश्वास मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी व्यक्त केला.

फिडेचे श्री. केतव मेहता (कॅलिफोर्निया, अमेरिका) यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहत डिजिटल पेमेंट यूपीआय पद्धतीप्रमाणे 'यूकेआय'देखील यशस्वी होईल व त्यासाठी सर्वजण प्रयत्नशील असल्याचे सांगितले. स्पेक्ट्रम इम्पॅक्टचे श्री. मिरीक गोगरी यांनी 'यूकेआय'मध्ये शेतकरी हाच केंद्रबिंदू असून शेतीत त्याचे नुकसान टळून उत्पन्न वाढावे हा प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले. तसेच सदर प्रायोगिक प्रकल्प यशस्वी होण्यासाठी व पुढे तो व्यापक स्तरावर राबविला जावा यासाठी सहभागी सर्व घटकांनी आपला अभिप्राय अवश्य द्यावा, असे आवाहन उपस्थितांना केले.

यावेळी आयएलएफचे श्री. सुनील खैरनार, यूकेआयचे श्री. महेश रसाळ, महाएफपीओ फेडरेशनचे श्री. संजय पांढरे, कृषिभूषण श्री. भूषण निकम, कृषी अभ्यासक श्री. दीपक चव्हाण यांचीदेखील भाषणे झाली. उद्घाटन सत्रानंतर 'यूकेआय' नेटवर्कवर सेवा पुरवणाऱ्या पहिल्या समूहाचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये अमायकस, हकदर्शक, फसल, फायलो, प्लांटिक्स आणि कार्नोट या प्रमुख ॲग्री-टेक स्टार्टअप्सचा समावेश होता. यानिमित्ताने विद्यापीठातील कृषिविज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. नितीन ठोके यांनी उपस्थित सहभागींना विद्यापीठ आवारातील कृषिविज्ञान केंद्राच्या प्रगत सुविधा आणि कृषी नवउपक्रमांची, कल्पनांची माहिती देण्यासाठी अभ्यास दौऱ्याचे यशस्वी आयोजन केले.

यूकेआय अर्थात युनायटेड कृषी इंटरफेस (UKI) हा भारतीय शेतकऱ्यांना अत्यंत सोप्या आणि परिचित माध्यमातून (जसे की व्हॉट्सॲप) कृषी सेवांचा सहज प्रवेश मिळवून देण्यासाठी तयार करण्यात आलेला अभिनव उपक्रम आहे. हा यूकेआय (UKI) नेटवर्कवर तयार करण्यात आलेला, परंतु सध्या प्रायोगिक तत्त्वावर असलेला एक 'पायलट व्हॉट्सॲप बॉट' व सध्या बीटा चाचणी टप्प्यात आहे. यामुळे शेतकऱ्यांना अनेक ॲप्स शिकण्याची किंवा डाऊनलोड करण्याची गरज उरत नाही. ते सर्व एका ठिकाणी उपलब्ध होऊ शकते. त्यात प्रामुख्याने हवामान अंदाज, पीक सल्ला, शेती उपकरणे भाड्याने घेणे किंवा खरेदी करणे, सरकारी योजनांची पात्रता तपासणे, तसेच शेतीमालाच्या चालू बाजारभावांची माहिती अशा महत्त्वाच्या सेवांचा लाभ शेतकरी सहज घेऊ शकतात. नाशिक जिल्हा हा यूकेआय (UKI) च्या पहिल्या प्रायोगिक प्रकल्पासाठी (पायलट प्रोजेक्ट) निवडण्यात आलेला आहे. फिडे, आयएलएफ आणि स्पेक्ट्रम इम्पॅक्ट या तीन ना-नफा संस्थांच्या पुढाकाराने हा प्रकल्प कार्यान्वित होत आहे. त्यात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ तांत्रिक, शैक्षणिक व पायाभूत सुविधांसाठीचा भागीदार आहे.

या कार्यशाळेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या सहभागातून यूकेआय नेटवर्कची सहनिर्मिती करणे हा होता. त्यात तंत्रज्ञान चमूने नेटवर्कचे वैशिष्ट्ये सादर केली, जसे की व्हॉट्सॲप बॉटद्वारे सेवा मिळवणे आणि उपस्थितांना त्याच्या प्रत्यक्ष हाताळणीची संधीदेखील देण्यात आली. त्यात नाशिक जिल्ह्यातील शेतकरी कंपन्यांचे ६० अग्रदूत, शेतकरी प्रतिनिधी आणि एफपीओ समन्वयक यांनी कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला. सहभागींनी मौल्यवान सूचना आणि अभिप्राय दिला, ज्यामुळे यूकेआय नेटवर्क अधिक उपयुक्त आणि शेतकऱ्यांच्या गरजांना अनुरूप बनवता येईल, असा विश्वास आयोजकांनी कार्यशाळा समारोपप्रसंगी व्यक्त केला. प्रास्ताविक, सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन संभा ऍग्रो प्रोडूसर कंपनीचे संचालक संदीप सोनवणे यांनी केले.

समन्वय बैठक

बी.एड. अभ्यासकेंद्र संचालक, समन्वय बैठक संपन्न





यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात बी.एड. अभ्यासकेंद्र संचालक, समन्वयक बैठक व समंत्रक उद्बोधन संपन्न झाले. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे आयोजित या कार्यक्रमात बी.एड. शिक्षणक्रम संरचना व संपर्कसत्रे (डॉ. सुभाष सोनुने), अध्ययन साहित्य व परिचय (डॉ. दयाराम पवार), बी.एड. मूल्यमापन (प्रा. विजयकुमार पाईकराव), प्राशिनक परीक्षक समीक्षक माहिती (प्रा. सज्जन थूल) याविषयी संबंधित तज्ज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन केले. प्रा. प्रवीण घोडेस्वार यांनी विद्यापीठ उपक्रम याविषयी माहिती दिली. बहाई अकादमीतर्फे मूल्यशिक्षणाचीही माहिती देण्यात आली, तसेच विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा विद्यापीठ शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालिका व या बैठकीच्या संयोजक प्रा. डॉ. संजीवनी महाले यांनी प्रथम वर्षे दिवाळी सत्राबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक प्रा. प्रकाश देशमुख, नोंदणी कक्षाचे उपकुलसचिव श्री. मनोज घंटे व भांडार कक्षाचे कक्ष अधिकारी श्री. गणेश चव्हाण यांनी शेवटी उपस्थितांच्या शंका समाधान केले. बैठकीस विद्यापीठाच्या बी.एड. अभ्यासकेंद्राचे संचालक, समन्वयक व संमंत्रक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महिला सक्षमीकरणासाठी महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेसोबत सामंजस्य करार



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे महिला सक्षमीकरणासाठी पुणे येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेसोबत (एमकेएसएसएस – एआयटी, सेंटर फॉर डेटा सायन्स, मशीन लर्निंग आणि ए.आय.) सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याअनुषंगाने दोन्ही संस्थांतर्फे केवळ महिलांसाठी म्हणून संगणक आधारित 'डेटा ॲनालेटीक्स विथ इंटर्नशिप' हा शिक्षणक्रम सुरू करण्यात येणार आहे. यासंदर्भात विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ सभागृहात झालेल्या बैठकीत विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड व महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या माहिती व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या संचालिका श्रीमती संपदा वर्धे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

यावेळी विद्यापीठाचे अंतर्गत गुणवत्ता आणि आश्वासन केंद्राचे संचालक डॉ. मधुकर शेवाळे, व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेचे संचालक तथा नियोजन अधिकारी डॉ. राम ठाकर, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, संगणकशास्त्र विद्याशाखेचे संचालक श्री. माधव पळशीकर, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या परीक्षा संयोजक श्रीमती रेवती पवार तसेच विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विद्याशाखेचे डॉ. योगेश वाघडकर, डॉ. प्रकाश खनाळे, श्री. मिलिंद देशपांडे व श्रीमती उज्ज्वला महाजन हे उपस्थित होते.

महिलांना शिक्षण देतानाच त्यांच्यातील कौशल्ये विकसित व्हावीत, त्यांना संबंधित औद्योगिक क्षेत्रात रोजगार व अनुभव मिळावा या हेतूने हा शिक्षणक्रम सुरू करण्यात येणार आहे. सहा महिने कालावधीच्या या प्रमाणपत्र शिक्षणक्रमात एक्सेल, पायथॉन, एसक्यूएल, पॉवर बी. आय. आदी तांत्रिक गोष्टींचे शिक्षण दिले जाईल. हा शिक्षणक्रम केल्याने मशीन लर्निंग आणि ए.आय. डेटा व्हिज्युलायजेशनमध्येही प्रभुत्व मिळविणे महिलांना शक्य होईल. त्यात प्रगत विश्लेषण तंत्राचेही ज्ञान दिले जाणार आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ सदर शिक्षणक्रम संयोजन, मूल्यमापन व प्रमाणित करण्याचे कार्य करणार आहे. या शिक्षणक्रमामुळे डेटाचलित अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या निर्माण झालेल्या संधींमध्ये महिलांना रोजगार प्राप्त होऊ शकेल. शिक्षण व कौशल्य विकासाद्वारे महिलांचे सक्षमीकरण करणे, महिलांच्या सक्षमीकरणासाठी गेल्या १२८ वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महिला शिक्षणाचा वारसा तंत्रज्ञानाच्या काळात पुढे नेण्यासाठी आणि सुलभ पद्धतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रयत्न करणार आहे.



संविधान दिन कार्यक्रम

संविधान उद्देशिका वाचन

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन होते. त्यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित सर्वांनी भारताच्या संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिकरित्या एकसुरात जाहीर वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी केले. यावेळी विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ.. संजीवनी महाले, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, जनसंपर्क अधिकारी श्री. महेंद्र बनसोडे यांच्यासह विद्याशाखा संचालक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी - कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रकाशचित्रवृत्त



मा. कुलगुरू, प्रा. संजीव सोनवणे यांनी पुणे पुस्तक महोत्सवातील विद्यापीठाच्या स्टॉलला दिलेली भेट.



विद्यापीठ मुख्यालयातील 300 किलो वॅट सौर वीज संच उद्घाटन.



यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी प्रसंगी उपस्थित मान्यवर.

वृत्तपत्र कात्रण कोलाज

मुक्त विद्यापीठात शिक्षणशास्त्र पदव्युत्तर संशोधक मार्गदर्शक कार्यशाळा उद्घाटन

लोकमंथन । प्रतिनिधी



Community News

Research paper writing workshop from today

फसवणूक टाळण्यासाठी सतर्क राहावे

डॉ. बिसेन : मुक्त विद्यापीठाच्या संशोधन निबंधलेखन कार्यशाळेचा समारोप



LOKMAT TIMES

YCMOU PRO

LKTM S3 201224

'UKI Samvad can address agricultural tasks of farmers'

Said VC-YCMOU during the workshop, asserting that it improves lives of f



संशोधन, निबंध लेखनाचे मुक्त विद्यापीठातर्फे धडे

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक

महिला सक्षमीकरणासाठी मुक्त विद्यापीठाचा सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क



MoU between YCMOU & MKSSS

NASHIK : Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU) has partnered with Maharshi Karve Stree Shikshan Sanstha (MKSSS), Pune, to launch a special-

विशाखा काव्य पुरस्कारासाठी मागविले प्रकाशित काव्यसंग्रह

मुक्त विद्यापीठातर्फे २५ डिसेंबरपर्यंत मुदत

■ सकाळ वृत्तसेवा

पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त हेमंत काळमेघ यांचे व्याख्यान संपन्न



Complete YCMOU homework by Dec 15

Nashik: The winter session ex-

aminations of Yashwantrao Cha-

van Maharashtra Open University

(YCMOU) will start fro

YCMOU to launch educational programme to empower wom

This will help them gain employment in relevant industrial secto

LOKMAT News Network

NASHIK, DEC 17



Benefits of this course

संशोधनापूर्वी ज्ञानाची पोकळी शोधा

YCMOU PRO MT S3 191224

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

